## प्रकरण पाचवे

# निष्कर्ष

# प्रकरण पाचवे

# निष्कर्ष

महाराष्ट्राच्या बदत्या राजकीय समीकरणांतील राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका या संशोधन विषयाअंतर्गत असे निष्कर्षात येत की, राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणाबरोबर देशाच्या राजकारणातसुद्धा प्रभावी पक्ष म्हणून कार्यरत आहे. काँग्रेस पक्षातील अंतर्गत गटबाजी व परकीय नेतृत्वाच्या मुद्यावरून तसेच पक्षातील प्रभावी नेत्यांची झालेली कुचंबणा ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या उदयाची महत्त्वाची कारणे आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अपत्य आहे, असे म्हटले तरी काही वावगे ठरणार नाही.

प्रातिनिधिक लोकशाही राजकारणामध्ये राजकीय पक्षाची भूमिका महत्त्वाची असते. कारण की, लोकशाही देशाच्या यशस्वितेचे गूढ राजकीय पक्षांच्या एकूण कार्यपद्धतीवर अवलंबून असते. देशाच्या राजकीय पक्ष पद्धतीमध्ये अनेक वैशिष्ट्ये आपणास पाहावयास मिळतात. यामधून पक्षाची ध्येय धोरणे आपणास दिसून येतात. भारताने स्वातंत्र्यानंतर अनेक पक्ष पद्धतींचा स्वीकार करून प्रत्येक राजकीय पक्षाला आपापल्या विकासासाठी वाव दिला आहे. अनेक पक्ष पद्धतींमुळे भारतात राष्ट्रीय व त्याहीपेक्षा प्रादेशिक पक्षाचे महत्त्व वाढताना दिसत आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणाचा अभ्यास करताना महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेला अनेक पक्ष प्रभावित करत असताना आपणास दिसते. महाराष्ट्र राज्याची स्थापना १ मे १९६० रोजी झाली असली तरी महाराष्ट्रात राजकीय पक्षांचे अस्तित्व मुंबई प्रांतापासून होते. अखिल भारतीय राजकीय पक्षांचे प्राबल्य आज राज्यात दिसून येते. संसदीय शासन पद्धतीमध्ये राजकीय पक्ष लोकांचे प्रतिनिधित्व संसदेत व राज्य विधिमंडळात करत

असतात. महाराष्ट्र राज्याच्या राजकारणातदेखील अनेक राजकीय पक्षांचे अस्तित्व आढळून येते. भारतातील बहुपक्ष पद्धतीने देशाच्या राजकारणाबरोबरच राज्यातील राजकारणातसुद्धा आपला ठसा उमटविला आहे. महाराष्ट्रात राष्ट्रीय पक्ष व प्रादेशिक पक्षाचे राजकारण महत्त्वपूर्ण राहिले आहे.

महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर किंबहुना पूर्वीपासूनच राजकीय पक्षांचे प्राबल्य दिसून येते. राष्ट्रीय पातळीवरील कार्य करणाऱ्या पक्षांनी सुद्धा आपला प्रभाव निर्माण केला आहे. यामध्ये प्रामुख्याने राष्ट्रीय पक्ष भारतीय जनता पार्टी या राष्ट्रीय पातळीवरील पक्षांचा उल्लेख करावा लागेल. त्याचप्रमाणे महाराष्ट्राच्या राजकारणात कार्य करणारे इतर प्रादेशिक पक्षसुद्धा आपले अस्तित्व सिद्ध करत आहेत. यामध्ये प्रामुख्याने शिवसेना, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, बहुजन समाज पक्ष शेकाप इत्यादी पक्ष आज महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत.

आजपर्यंतच्या महाराष्ट्रातील राजकीय पक्षांचा इतिहास पाहिला तर काँग्रेस पक्षाचे वर्चस्व दिसून येते पण काही दशकांनंतर त्याला तोडीस तोड देणारे इतर राजकीय पक्ष सुद्धा निर्माण झाले आहेत. आजसुद्धा महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस पक्षाचे प्राबल्य टिकून आहे. १९६० ते आजपर्यंत १९७८ ते १९८० आणि १९९५ ते १९९९ हा कालावधी वगळता काँग्रेस पक्षाने महाराष्ट्राच्या राजकारणात आपला दबदबा कायम ठेवला आहे. महाराष्ट्रातील राजकीय पक्षपद्धती ही विचारसरणी व कार्यक्रम किंवा धोरणाच्या आधारावर विकसित झालेली नसून ती विभूति पूजा व व्यक्तिवलय या भोवती केंद्रित झालेली दिसते.

शिवसेनेचा उदय व विकास आणि विघटन हे बाळासाहेब ठाकरे यांच्या व्यक्तिमत्त्वाचाच आविष्कार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस हा राष्ट्रीय पक्ष असला तरी तो शरद पवार यांच्या इच्छाशक्तीवर टिकून आहे. त्याचबरोबर अलीकडे स्थापन झालेला महाराष्ट्र

नवनिर्माण सेना हा पक्ष राज ठाकरे यांनी शिवसेनेतून बाहेर पडून आपला करिश्माचाच परिणाम दाखविला आहे. याचबरोबर रिपब्लिकन पक्षाचे झालेले विघटनसुद्धा त्या त्या पक्षातील व्यक्तिवलयाच मोठा प्रभाव आपणास दिसून येतो.

महाराष्ट्रातील प्रादेशिक पक्षांचा उदय हा शिवसेनेच्या उदयापासून झाला आहे असे दिसते. काँग्रेस पक्षाला महाराष्ट्रात आव्हान देण्यासाठी एक हिंदुत्ववादी राजकीय पक्ष म्हणून शिवसेना पक्षाचा महाराष्ट्रात झालेला राजकीय विकास व त्याचबरोबर भारतीय जनता पक्षासारख्या मोठ्या पक्षाबरोबर केलेली युती हे त्याचे महत्त्वाचे गमक आहे. महाराष्ट्रातील राजकीय पक्षपद्धतीला आता विघटनवादाचा रोग लागल्याचे दिसून येते. यातून शिवसेना, आर.पी.आय., काँग्रेस पक्षसुद्धा सुटला नाही. पुढे काँग्रेस पक्षाच्या वाढत्या प्राबल्यास अंतर्गत गटबाजी मारक ठरून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा उदय व कमी कालावधीत या पक्षाचा झालेला राष्ट्रीय व राज्य पातळीवर झालेला विकास आपणास पाहावयास मिळतो.

महाराष्ट्रातील किंबहुना देशातील राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस हा पक्ष मुख्य प्रवाहात उभा असताना आपणास दिसतो. भारतीय स्वातंत्र्याच्या पूर्वीपासून अस्तित्वात असलेली राष्ट्रीय काँग्रेस पक्ष व त्याचे संघटन हे इतर राजकीय पक्षाच्या संघटनांपेक्षा मजबूत असल्याचे आपणास आढळते. पण प्रत्येक पक्षामध्ये असलेल्या अंतर्गत गटबाजीतून काँग्रेस पक्ष सुद्धा सुटला नाही. काँग्रेस पक्षातील नेतृत्व राजकारण, समन्वयाचा अभाव यामुळे शरद पवार याच्यासारख्या प्रभावी नेत्यांने पक्षातील होणाऱ्या गटबाजीच्या राजकारणाच्या असंतोषातून १९९९ मध्ये 'राष्ट्रवादी काँग्रेस' हा नवीन पक्ष स्थापन केला. त्यांच्यासोबत काँग्रेसमधील प्रभावी नेते संगमा, तारिक अन्वर व कार्यकर्त्यांनीसुद्धा काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी दिली.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापनेपूर्वी शरद पवार हे काँग्रेस पक्षातील एक वरिष्ठ प्रभावी नेतृत्व म्हणून ओळखले जात होते. यशवंतराव चव्हाण यांच्यानंतर महाराष्ट्रात

शरद पवार या प्रभावी नेतृत्वाचा उदय झाला होता. काँग्रेसची धुरा ही महाराष्ट्रात शरद पवार यांच्या खांद्यावर होती. महाराष्ट्राच्या राजकारणात सर्वात जास्त काळ मुख्यमंत्रिपदाची धुरा काँग्रेस पक्षाने शरद पवार यांना दिली होती. परंतु शरद पवार यांच्या दिल्लीच्या राजकारणातील प्रवेशानंतर व राष्ट्रीय पातळीवरील त्यांचा वाढता प्रभाव हा काँग्रेस पक्षातील दुसऱ्या नेत्यांना पटला नाही त्यामुळे शरद पवार यांची या पक्षात उपेक्षा सुरू झाली. शरद पवार एक कुशल राजकारणी, समाजकारणी व प्रशासक असल्यामुळे त्यांनी पक्षहितासाठी महत्त्वाचे कार्य केले होते.

नंतरच्या काळात काँग्रेस पक्षातील सोनिया गांधी यांच्या नेतृत्वाच्या व स्वदेशीच्या मुद्यावरून शरद पवारांना झालेला विरोध हा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या निर्मितीला पोषक ठरला. याचा परिणाम राष्ट्रीय काँग्रेसला चांगल्या प्रकारे दिसला, महाराष्ट्रातील जनतेने शरद पवार यांच्या बाजूने कौल देऊन त्यांच्या पक्षाला लोकप्रियता मिळाली. अल्प कालावधीत शरद पवार यांच्या पक्षाने देशच्या राजकारणात बिरुदावली निर्माण केली. १९९९ मध्ये स्थापन झालेल्या या पक्षाने राज्याच्या राजकारणात सुरुवातीपासून सत्तारूढ होण्याचा मान मिळविला. काँग्रेस पक्षाशी युती करून महाराष्ट्रात व केंद्रात पक्ष सत्तेत सहभागी असल्याचे आपणास दिसते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष देशातील केंद्रीय पातळीवरील राजकारणालासुद्धा प्रभावीत करून केंद्राच्या सत्तेत सुद्धा सहभागी होऊन आपले कार्य करत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचा हा विकास शरद पवार यांच्या व्यक्तिवलायाच्या प्रभावातून झालेला दिसून येतो. शरद पवार यांचा जन्म शेतकरी कुटुंबात झाला असल्यामुळे शेतकऱ्यांच्या प्रश्नांविषयी असणारा जिव्हाळा व त्यासाठी केलेले कार्य मोलाचे आहे असे आपणास दिसते. देशातील सत्ताधारी पक्षातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या सहभागामुळे आज त्यांच्याकडे कृषीमंत्रिपदाची धुरा दिलेली आहे व ते व्यवस्थितपणे सांभाळत आहेत.

राजकीय पक्ष हा कोणत्याही देशातील राजकीय व्यवस्थेमध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत असतो. ज्या-ज्या देशातील लोकशाही शासन पद्धतीचे अस्तित्व हे त्या देशातील राजकीय पक्षाच्या प्रभावावरून आपणास दिसून येते. व्यक्ती आणि गट यांना राजकारणाशी जोडून घेण्यात राजकीय पक्षाचा महत्त्वाचा वाटा असतो. व्यक्तींना राजकारणाशी जोडून घेण्यात आणि सत्तेच्या खेळांचे साक्षीदार व भागीदार बनविण्याच्या कामी राजकीय पक्ष महत्त्वाचे ठरतात. राजकीय पक्षाचे अस्तित्व हे लोकशाही विचारधारेच्या दृष्टिकोनातून फार महत्त्वाचे आहे.

राजकीय पक्षांबद्दल जर बोलायचे झाले तर लोकांचा असा समूह संगठित झालेला आहे की, जो सार्वजनिक प्रश्नांबद्दल एक समान विचारधारा ठेवतो आणि राजकीय दृष्टिकोनातून आपल्या कार्याला ध्येय धोरणाला व्यापकता यावी म्हणून शासनावर नियंत्रणाच्या माध्यमातून सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करत असतो. ज्या देशात वास्तविकपणे पक्षपद्धती असेल म्हणजे तिथे दोन किंवा दोनपेक्षा जास्त संघटित राजकीय पक्ष असतील तर त्या ठिकाणी राजकीय प्रौढता असते असे दिसून येते.

ऐतिहासिक विकासाच्या दृष्टिकोनातून राजकीय पक्षाचा विकास हा आधुनिक मताधिकारांचे अपत्य आहे. म्हणजेच मतदान प्रणालीच्या माध्यमातून राजकीय पक्षांचा विकास झाला आहे. म्हणजे राजकीय पक्षाची उत्पत्ती ही मानवी स्वभाव सिद्धांतातून झाली असल्याचे दिसून येते. एखाद्या पक्षाविषयी असलेले आकर्षण व त्याप्रती असणारी राजकीय अपेक्षा या माध्यमातून एखाद्या पक्षाविषयी असलेला जनतेचा कौल व राजकीय व्यवहार यामुळे राजकीय पक्षाचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून मानवी स्वभाव सिद्धांत महत्त्वाचा दिसतो.

आधुनिक पक्ष पद्धतीचा विकास सर्व प्रथम युरोपमध्ये झाल्याचा आपणास दिसून येतो. आधुनिक पक्ष पद्धतीचा उगम हा टप्प्याटप्प्याने झाला असल्याचे दिसून येते व त्याला दुसरे महायुद्ध सुद्धा कारणीभूत असल्याचे दिसून येते. १९ व्या शतकाच्या मध्य

कालावधीमध्ये युरोपियन राजकीय जीवन अनुदारवादी व उदारमतवादी संघर्षाच्या विचारधारेखाली वावरत होते. १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीच्या परिणामातून स्वातंत्र्य, समता, बंधुता या माध्यमातून झालेल्या वैचारिक विकासातून राजकीय विकासास सुरूवात झाली. भांडवलशाही आणि समाजवादी विचारधारेच्या संघर्षातून पक्ष पद्धतीची संकल्पना निर्माण झाल्याचे दिसून येते.

आज भारत देशामध्येसुद्धा राजकीय पक्षपद्धती अस्तित्वात असल्याचे कारण ब्रिटनच्या राजकीय पक्ष पद्धतीचा परिणामातून दिसून येते. ब्रिटिशांनी भारतावर सुमारे १५० वर्षे राज्य केले. राज्य चालविण्याची त्यांची ध्येय धोरण व शासन पद्धतीविषयी रूजविलेली राजकीय मूल्ये या सर्व गोष्टींचा परिणाम राजकीय पक्षपद्धतीच्या विकासास कारणीभूत ठरली असल्याचे दिसते. ब्रिटिशांच्या स्वार्थी राजकीय, आर्थिक धोरणांच्या विरोधातून भारतीय लोकांमध्ये झालेली राजकीय संघटनांबद्दलची जागृती व १८८५ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसची झालेली स्थापना ही भारतातील राजकीय पक्षपद्धतीच्या विकासाचे महत्त्वाचे उदाहरण आपणास म्हणता येईल. सुरुवातीस राष्ट्रीय सभा या नावाने स्थापन झालेली संघटनेचे रूपांतर एका राजकीय पक्षात झाले. सर्वप्रथम श्री. एम.एन. रॉय यांनी १९२५ मध्ये पाश्चात्य विचारधारेच्या प्रभावातून कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली ही एक प्रकार राजकीय पक्षपद्धतीच्या विकासाची परिणती म्हणून आपणास दिसून येते.

भारत देशाला स्वातंत्र्य मिळल्यानंतर भारतामध्ये स्वत:चे सरकार स्थापण्यासाठी काँग्रेस पक्षाने महत्त्वाची भूमिका बजावली व लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केल्यामुळे भारतात नंतरच्या काळात अनेक राजकीय पक्षांचा उदय झाला व याचे स्वरूप भारतात बहुपक्षपद्धती परिणती आपणास विविध पक्षांच्या अस्तित्वामधून दिसून येते. भारत हा एक लोकशाही समृद्ध राष्ट्र असून इतर लोकशाही विचारसरणी असणाऱ्या देशाप्रमाणे भारतातसुद्धा राजकीय पक्षांचे प्राबल्य दिसून येते. भारतीय स्वातंत्र्य काळापासून आजपर्यंत लोकशाही व्यवस्थेमध्ये राजकीय पक्षांचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण

राहिलेले आहे. या दृष्टिकोनातून भारतीय राजकीय प्रक्रियेत राजकीय पक्ष मोलाची कामगिरी करत आहेत. आजमितीस भारतात बहुपक्ष पद्धतीचे अस्तित्व दिसत असून यामध्ये राष्ट्रीय काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, बहुजन समाज पार्टी अशा राष्ट्रीय पक्षांचे अस्तित्व आपणास दिसून येते.

याचबरोबर राष्ट्रीय पक्षांप्रमाणे प्रादेशिक पक्षांचे महत्त्वसुद्धा आज वाढताना दिसून येते.

प्रस्तुत संशोधनात महाराष्ट्राच्या बदलत्या राजकीय समीकरणामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसच्या भूमिका हा असल्यामुळे प्रमुख विषय हा महाराष्ट्राभोवती केंद्रित झाला असल्यामुळे महाराष्ट्राच्या भौगोलिक, सामाजिक, आर्थिक व राजकीय विश्वाचा अभ्यास करणे अनिवार्य असते. भारतातील २८ राज्यांपैकी महाराष्ट्र राज्य देशातील एक महत्त्वाचे राज्य म्हणून ओळखले जाते. १ मे १९६० रोजी विदर्भ, मराठवाडा, खानदेश, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राचा समावेश असलेल्या प्रदेशातून महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्राच्या स्थापनेच्या वेळी महाराष्ट्रात २६ जिल्हे आणि २३५ तालुके होते. सध्या महाराष्ट्रात ३५ जिल्हे व ३५३ तालुके आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या भौगोलिक सीमा पाहता वायव्येस सातमाळा डोंगर रांगा, सातपुडा पर्वत रांगा, गाळण टेकड्या आहेत. उत्तरेस सातपुडा पर्वत रांगा व त्यांच्या पूर्वेकडे गाविलगड टेकड्यांनी वेढलेला, तर ईशान्येस देरकसा टेकड्या आहेत. महाराष्ट्राचे क्षेत्रफळ ३०७७१३ चौ.कि.मी. असून क्षेत्रफळाच्या दृष्टिकोनातून राजस्थान व मध्य प्रदेश या राज्यानंतर महाराष्ट्राचा तिसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्र राज्यात, मावळ व कोकण हे प्राकृतिक प्रादेशिक विभाग आहेत. सह्याद्रीच्या पूर्व पठाराचा प्रदेश म्हणजे महाराष्ट्र पठार किंवा देश होय. सह्याद्री पर्वताच्या पूर्वेकडील उतारावर असलेल्या खोऱ्यांना मावळ म्हणतात, तर सह्याद्रीच्या पश्चिम उतारापासून अरबी समुद्रापर्यंत असलेली अरूंद किनारपट्टी म्हणजे कोकण होय.

सह्याद्री पर्वतांच्या पूर्वेस असलेल्या पठारी प्रदेशाची निर्मिती ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे झाली असून त्यांना दख्खनचे पठार असेही म्हणतात. महाराष्ट्र पठारावर तापी-पुर्णा खोरे, प्राणहिता खोरे, गोदावरी खोरे, कृष्णा खोरे इ. खोरी पाहावयास मिळते. महाराष्ट्राच्या भूगर्भामध्ये आर्कियम खंड, कडप्पा श्रेणीचे खडक, विंध्य श्रेणीचे खडक आणि गोंडवना श्रेणीचे खडक आढळतात. महाराष्ट्रातील नद्यांचे पूर्व वाहिनी व पश्चिम वाहिनी नद्या असे दोन प्रमुख विभाग होतात. पूर्ववाहिनी नद्यांमध्ये गोदावरी, भीमा, कृष्णा या नद्यांचा समावेश होतो. तर पश्चिम वाहिनी नद्यांमध्ये उल्हास, सावित्रीसारख्या नद्यांचा समावेश होतो. यापैकी गोदावरी नदी दक्षिण भारताची गंगा म्हणूनही ओळखली जाते. महाराष्ट्रातील साधनसंपत्तीतील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे मृदा होय. गोदावरी, भीमा, कृष्णा तसेच तापी नदीच्या खोऱ्यात आढळणारी सर्वात जास्त सुपीक मृदा म्हणजे काळी मृदा किंवा रेगूर मृदा होय.

इंग्रजांच्या आगमनाच्या वेळी भारत हा आर्थिक, सामाजिक, भौतिकदृष्ट्या अतिशय मागासलेल्या अवस्थेत होता. अंधश्रद्धा, परंपरागत चालीरीती, जातीव्यवस्था या सामाजिक बंधनामध्ये अडकलेला होता. त्यावर धर्माचा पगडा, ज्ञानविज्ञानाचा अभाव होता. म्हणून वैज्ञानिक दृष्टी समाजात नव्हती. समाजातील अनेक दुष्ट प्रथा, परंपरा, रूढी, जातीभेद, ग्रंथ प्रमाण्यवाद प्रारंब्धवाद इत्यादींनी भारतीय समाजाच्या प्रगतीत अडथळे उभे केले होते. पण ते दूर करण्यासाठी समाजसुधारणा व धार्मिक सुधारणांसाठी प्रयत्न केला गेला. महाराष्ट्रसुद्धा या सर्व गोष्टींपासून अपवाद नव्हता.

महाराष्ट्रात सामाजिक सुधारणेच्या दृष्टिकोनातून म. फुले यांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. शिक्षण, स्त्रीदास्य मुक्ती, स्त्रीशिक्षण, विधवांचे प्रश्न, जातीभेद, अस्पृश्यता निर्मूलन यासाठी म. फुले यांनी सर्वप्रथम कार्य केले. ईश्वर एकच आहे, ईश्वर भक्ती सर्वांसाठी, व्यक्तीच श्रेष्ठ, सत्य व बंधुभाव, सदाचाराचा मार्ग इत्यादी समाजशिक्षणाचे त्यांनी मार्ग सांगितले. पुढे महर्षी कर्वे यांनी १९०७ मध्ये

महाविद्यालयाची स्थापना केली. स्त्री शिक्षणाने परंपरा, धर्मांधता, कर्मठपणा यांच्या ओझ्याखाली दबलेली स्त्री ज्ञानी होऊ लागली. पुढे एस.एन.डी.टी. विद्यापीठ समता संघ व ३० शैक्षणिक संस्था स्थापन करून शैक्षणिक चळवळ निर्माण केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित समाजात स्वाभिमान निर्माण करून त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारा विरोधात त्यांना संघटित केले. अस्पृश्यांची आर्थिक दास्यातून मुक्तता केली. शिक्षण संस्थेचे जाळे विणले. धर्मांध चालीरीतींना मूठमाती दिली. आखिल भारतीय दलिताना त्यांनी 'शिका, संघटित व्हा व संघर्ष करा' असा मूलगामी व्यवहार्य संदेश दिला. भारतीय राज्यघटना निर्माण करून सर्व समाजात समानता निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

छ. राजर्षी शाहू महाराजांनीसुद्धा सामाजिक क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी शिक्षण क्षेत्रात महत्त्वाचे कार्य केले. प्राथमिक शिक्षणावर भर, सक्तीचे व मोफत शिक्षण, स्त्री शिक्षणाचा पुरस्कार, वसतिगृहांची स्थापना त्याचबरोबर जातिभेद व अस्पृश्यता निर्मूलनाकरिता भरीव कामगिरी केल्याचे आपणास आढळते. छ. शाहूची प्रेरणा घेऊन डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्रातील रयत शिक्षण संस्था, डॉ. बापूजी साळुंखेनी त्या शिक्षणाची गंगा खेडोपाडी नेली. यामुळे महाराष्ट्रात सामाजिक प्रबोधनाची सुरुवात होऊन मानवी समता प्रस्थापित होण्यास महत्त्वाची मदत झाली.

संयुक्त महाराष्ट्र आपल्या स्थापनेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करीत असताना या निमित्ताने मे २०१० पासून राज्यभर सामाजिक सुधारणांविषयी अनेक ध्येय धोरणांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केला गेला. भारत देश स्वातंत्र्य झाल्यानंतर भारताने संमिश्र अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. या पद्धतीतून भारतीय अर्थव्यवस्थेची प्रगती करण्यासाठी नियोजन आयोगाची स्थापना करून या माध्यमातून आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला गेला. यासाठी पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून विकासाचा आराखडा तयार केला गेला. यासाठी सर्व राज्यांना संघटित करून याची अंमलबजावणी करण्यात आली.

महाराष्ट्रातील आर्थिक विकासासंबंधी बोलायचे झाल्यास महाराष्ट्रात पूर्वीपासून आर्थिक सुधारणा करण्यासाठी प्रयत्न केले गेले. समाज सुधारकांनी महाराष्ट्रात वेगवेगळ्या माध्यमांतून छोटे-उद्योग स्थापन करून आर्थिक विकास साधण्याचा प्रयत्न केला गेला. आज महाराष्ट्रात देशातील इतर राज्यांपेक्षा सर्वात जास्त गुंतवणूक केली जाते त्याचबरोबर महाराष्ट्राने औद्योगिकदृष्ट्या चांगली प्रगती केल्याचे आपणास दिसून येते. MIDC, MSFC ची स्थापना करून देशाच्या अर्थव्यवस्थेबरोबरच राज्याच्या अर्थव्यवस्थेमध्येही निर्यातीला अनन्यसाधारण महत्त्व आले. महाराष्ट्राच्या होणाऱ्या निर्यातीमध्ये अलीकडील काळात सातत्यपूर्ण वाढ होत गेली आहे.

अर्थव्यवस्थेच्या वेगवान विकासासाठी मोठ्या प्रमाणावरील भांडवल गुंतवणुकीची आवश्यकता असते. परंतु भांडवल उपलब्ध करण्यात सार्वजनिक क्षेत्र दुर्बल ठरले असून सार्वजनिक क्षेत्राच्या मर्यादा समोर आल्या आहेत. खासगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरणाच्या युगात खासगी भांडवलाचे महत्त्व वाढून विशेषत: विदेशी थेट गुंतवणुकीचे (FDI) महत्त्व मोठ्या प्रमाणावर महाराष्ट्रात वाढत आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासाच्या दृष्टिकोनातून दळणवळणाच्या साधनाला आत्यंतिक महत्त्व दिले गेले आहे. कारण की, शेतमाल, औद्योगिक माल, प्रवासी वाहतुकीच्या दृष्टिकोनावर राज्याचा आर्थिक विकास अवलंबून आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रातील आंतरराष्ट्रीय विमानतळांची संख्या तीन आहे. मुंबई, नागपूर आणि पुणे या शहरात आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे.

महाराष्ट्राला ७२० कि.मी. लांबीची सागरी किनारपट्टी लाभलेली आहे. राज्यामध्ये मुंबई पोर्ट ट्रस्ट व न्हावा शेवा येथील जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट ही दोन मोठी बंदरे विकसित केली आहेत. शासनाने खासगी क्षेत्राच्या सहकार्यातून ४८ लहान बंदरे विकसित करण्याचे धोरण निश्चित केले आहे. महाराष्ट्र हे भारतातील विकसित राज्य मानले जाते. औद्योगिकदृष्ट्या महाराष्ट्र पहिल्या क्रमांकाचे राज्य असले तरी अनेक बाबतीत महाराष्ट्राच्या विकासविषयक आकडेवारीचे तुलनात्मक मानक म्हणून संदर्भ दिले

जातात. परंतु प्रादेशिकदृष्ट्या संपूर्ण महाराष्ट्राचा विकास एकसारखा झालेला नाही. महाराष्ट्राची अर्थव्यवस्था ही केंद्रीय नियोजनाचा भाग आहे. केंद्र शासनाने वेळोवेळी दिलेली अनुदाने अंदाजपत्रकातील तरतुदी, करांचा वाटा यावर महाराष्ट्राचा विकास अवलंबून आहे. पंचवार्षिक योजनेच्या उद्दिष्ट्यांचे ध्येय गाठणे हा पण एक अर्थव्यवस्थेचा मूलभूत भाग आहे.

अखिल भारतीय पातळीवर महाराष्ट्रात उदय पावलेल्या प्रादेशिक पक्षांनी महाराष्ट्रात अखिल भारतीय राष्ट्रीय पक्षांशी युती करून प्रभावित केलेले राष्ट्रीय पातळीवरील राजकारण आपणास यात पाहावयास मिळते. महाराष्ट्राच्या राज्यकर्त्यांनी आज घडीला राष्ट्रीय पातळीवर महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त केले आहे. महाराष्ट्राच्या राजकारणाचे अध्ययन करताना महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेला प्रभावीत करणाऱ्या राजकीय पक्षाचे अध्ययन करणे जिकिरीचे आहे. महाराष्ट्रात १९५६-५७ पासून पक्षीय राजकारणाचा जो विकास झाला त्याला राष्ट्रीय पातळीवरील काँग्रेस वर्चस्वाची पार्श्वभूमी लाभली होती. १९७७ मध्ये प्रथम महाराष्ट्रात काँग्रेसला धक्का बसला याला जबाबदार राष्ट्रीय राजकारण होते.

महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेत महाराष्ट्र स्थापनेपासून राष्ट्रीय पक्ष व प्रादेशिक पक्षाचे महत्त्व राहिले आहे. महाराष्ट्रात सुरुवातीपासून राष्ट्रीय पातळीवरील काँग्रेस पक्षाचे प्राबल्य राहिलेले आहे. परंतु महाराष्ट्रातील काँग्रेस व्यवस्थेला तडे जाण्यास १९७२ पासून सुरुवात झाली होती. १९८० मध्ये पुन्हा काँग्रेस केंद्रात सत्तेवर आली. राष्ट्रीय राजकारणाप्रमाणेच महाराष्ट्रातही काँग्रेसचे प्रभुत्व निर्माण झाले. १९९० ते १९९६ या काळात महाराष्ट्रातील द्विध्रुवीय राजकारणाला छेद देत तिसऱ्या आघाडीचे राजकारण सुरू झाले. शिवसेना-भाजप यांच्या उदयामुळे जे पक्ष सीमांत ठरले त्यांनी सतत तिसऱ्या आघाडीचे राजकारण केले. पक्षीय स्पर्धा जरी द्विध्रुवीय चौकटीत चालवलेली वाटते, तरी १९९९ नंतर महाराष्ट्रीय पक्षीय राजकारण मूलत: बहुध्रुवीय बनत आहे.

महाराष्ट्रातील राजकारणात शेकाप, जनता दल, बहुजन महासंघ, भारतीय रिपब्लिकन पक्ष, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, जनसुराज्य पक्ष, बहुजन समाज पार्टी, शिवसेना इ. प्रादेशिक पक्षांच्या उदयामुळे महाराष्ट्रात द्विध्रुवीय राजकारणाला तडा जात आहे. काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना हे चार पक्ष महाराष्ट्राच्या राजकारणात मध्यवर्ती भूमिका बजावत असले तरी ही इतर पक्षांचे सक्रिय राजकारणसुद्धा महत्त्वाचे आहे. महाराष्ट्रातील राजकारण हे या पक्षांभोवती फिरत आहे.

महाराष्ट्रातील राजकारण हे सुरुवातीस काँग्रेस पक्षाचे राजकारण म्हणून बघितले गेल्याचे दिसून येते. महाराष्ट्रातील राजकीय पक्ष पद्धतींचा उगम हा महाराष्ट्र स्थापनेच्या पूर्वीपासून झालेला दिसून आला आहे. महाराष्ट्रातील पक्षीय राजकारणाचे स्वरूप सुरुवातीस एकध्रुवीय नंतर काही काळात द्विध्रुवीय राजकारण सद्यकालीन परिस्थितीत इतर प्रादेशिक पक्षांच्या उदयामुळे बहुध्रुवीय राजकारणाकडे वळले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा उदय हा राष्ट्रीय काँग्रेसमधील स्वार्थी व गटबाजी राजकारणातून झाला असल्याचे दिसून येते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेस कारणीभूत असलेले महत्त्वाचे कारण शरद पवार व त्याच बरोबर त्यांना केलेला काँग्रेस पक्षातील विरोध होय.

राष्ट्रीय काँग्रेस पक्षातील शरद पवार हे इतर काँग्रेस नेत्याच्या समकक्ष महत्त्वाचे नेते काँग्रेस पक्षात होते. महाराष्ट्रात राष्ट्रवादी काँग्रेसची भूमिका ही सत्ताधारी पक्ष म्हणून महत्त्वाची मानली जाते. शरद पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला राष्ट्रीय पातळीवरचा पक्ष म्हणून अल्पकालावधीत या पक्षाची उभारणी केली. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने काँग्रेस पक्षावर महाराष्ट्राच्या राजकारणात वर्चस्व निर्माण केले आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची विचारसरणी ही धर्मनिरपेक्षतेच्या विकास या तत्त्वावर आधारित आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात काँग्रेस पक्षाचे वर्चस्व आपणास अनेक दशकांपासून दिसून येते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेमागे सोनिया गांधी यांची काँग्रेसमधील एकाधिकारवृत्ती व त्यांच्याभोवती असणारे स्वार्थी नेते व राजकारण होय.

महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने स्थापनेपासून सर्व पक्षांच्या तुलनेत राजकीय मत प्रणालीवर पकड निर्माण केली आहे.

राजकीय पक्ष पद्धतीचा उगम प्रथमत: युरोपमध्ये झाल्याचा दिसून येतो. राजकीय पक्ष हा व्यक्ती व गट यांना राजकारणाशी जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे. राजकीय पक्षांचे अस्तित्व हे लोकशही विचारधारेच्या दृष्टिकोनातून फार महत्त्वाचे आहे. राजकीय पक्ष हे लोकशाहीवादी विचारांची कास धरून सरकार चालविण्यासाठी अपरिहार्य असतात. राजकीय पक्ष उत्पत्ती व विघटनाची मुख्य व्याख्या ही मानवी स्वभाव सिद्धांतावर आधारित आहे.

भारतीय पक्ष पद्धती ही बहुपक्ष पद्धती असून यावर पाश्चात्य राजकीय प्रणालीचा प्रभाव दिसून येतो. आधुनिक पक्ष पद्धतीचा विकास सर्वप्रथम युरोप व त्यानंतर अमेरिकेत झाला असल्याचे दिसून येते. भारतात पक्ष पद्धतीचा उगम हा सुरुवातीस काँग्रेसप्रणीत संघटनेच्या माध्यमातून झाल्याचे दिसून येते. काँग्रेस पक्षाची स्थापना १८८५ मध्ये झाली. त्यांचा सुरुवातीचा उद्देश विदेशी शासनावर दबाब टाकणे हा होता. भारतीय जनता पक्ष हा सुरुवातीस जनसंघ म्हणून अस्तित्वात होता. या संघाची स्थापना १९५१ मध्ये श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी केली.

सद्यस्थितीतील राष्ट्रीय राजकारणात भारतीय जनता पक्ष हा एक प्रबळ विरोधी पक्ष म्हणून अस्तित्वात आहे. महाराष्ट्राचे भौगोलिकदृष्ट्या चार विभाग पडतात. यामध्ये कोकण, मराठवाडा, विदर्भ, पश्चिम महाराष्ट्र हा प्रदेश येतो. महाराष्ट्राला भौगोलिकतेच्या माध्यमातून महत्त्वाचे नैसर्गिक वरदान प्राप्त झाले आहे. आर्थिक विकासाच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्रात देशात प्रगत राज्य म्हणून ओळखले जाते. महाराष्ट्राला देशात औद्योगिक क्षेत्रात आघाडीवर असलेले राज्य म्हणून ओळखले जाते.तसेच सर्वात जास्त परकीय गुंतवणूक महाराष्ट्रात झाली आहे.

महाराष्ट्रात इतर उद्योगधंदे व कुटीर उद्योग सहकारी साखर कारखाने यांची प्रगती नेत्रदीपक आहे. महाराष्ट्रात सामाजिक सुधारणांविषयी महाराष्ट्र स्थापनेपूर्वीपासून समाजसुधारकांचे योगदान राहिलेले आहे. महाराष्ट्रातील शैक्षणिक प्रगती ही सामाजिक सुधारणेचा भाग असल्याचे दिसून येते. महाराष्ट्र सांस्कृतिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचे राज्य आहे. यामध्ये विविध सांस्कृतिक वैशिष्ट्ये विविध जाती, धर्मांचे अस्तित्व यामध्ये दिसून येते. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विकासाचा वारसा हा कवी, संत, थोर पुरुष यांच्यापासून आलेला दिसून येतो. महाराष्ट्रातील राष्ट्रीय व प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व हे महाराष्ट्रातील राजकारणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रातील राजकारणात सुरुवातीपासून काँग्रेसचे वर्चस्व असल्याचे दिसून येते. १९९०-१९९५ या कालावधीत काँग्रेस वर्चस्वाला आव्हान देण्याचे काम शिवसेना-भाजप या पक्षांनी केले आहे. महाराष्ट्रात काँग्रेस, भाजप या राष्ट्रीय पक्षांबरोबर शिवसेना, मनसे, आर.पी.आय. इतर प्रादेशिक पक्षांचे कार्यसुद्धा महत्त्वाचे आहे. राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्राच्या राजकारणात एक प्रभावी पक्ष उदयास आला असून पक्ष स्थापनेपासून आजपर्यंत हा सत्तेचा भागीदार पक्ष म्हणून कार्य करीत आहे.

**शिफारशी :-**

१) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापनेला काँग्रेसची अंतर्गत गटबाजी, स्वार्थी राजकारण जबाबदार असल्यामुळे काँग्रेस पक्षाने या घटकांवर नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे.

२) राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा महाराष्ट्रातील प्रभावी पक्ष असला तरी महाराष्ट्रा व्यतिरिक्त देशाच्या इतर राज्यांमध्ये या पक्षाचा विस्तार होणे गरजेचे आहे.

३) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला महाराष्ट्रात आपली मतपेढी आणखी मजबूत करण्याची गरज आहे.

४) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामधील अंतर्गत गटबाजी उदयास येत आहे. यामुळे या पक्षाला भविष्यात धोका निर्माण होऊ शकतो.

५) राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अस्तित्व शरद पवार यांच्या व्यक्तिवलयावर आधारित आहे. शरद पवार यांच्याप्रमाणे इतर नेत्यांनीसुद्धा या पक्षावर पकड मजबूत करणे आवश्यक आहे.

६) महाराष्ट्रातील राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेसने समाजातील इतर जाती-संप्रदायाच्या पक्षांना जवळ घेऊन काम केल्यास हा पक्ष अधिक प्रबळ होऊ शकतो.

७) महाराष्ट्रातील राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने सामाजिक, आर्थिक, राजकीय विकासाचा नवा आराखडा निर्माण केल्यास राष्ट्रवादी काँग्रेसची प्रतिमा चिरकाल महाराष्ट्राच्या राजकारणात टिकून राहील.

८) भारतातील पक्षपद्धती ही बहुपक्षपद्धती असल्याचे आपणास दिसते. पण स्थिर सरकार चालविण्यासाठी या पक्ष पद्धतीला लगाम लावणे आवश्यक आहे.

९) भारतातील बहुपक्षपद्धती ही लोकशाहीसमोरील मोठे आव्हानं होऊन बसले आहे. या पक्ष पद्धतीमुळे राष्ट्रीय विकास साधण्याबद्दल साशंकता निमार्ण होत आहे.

१०) राष्ट्रीय राजकीय विकास व स्थिर सरकार चालविण्यासाठी पक्षीय नियोजन आवश्यक असते. यामुळे बहुपक्ष पद्धतीला तिलांजली देऊन द्विपक्षीय पक्ष पद्धतीचा अंगीकार करणे आवश्यक आहे.

११) भारतीय लोकशाही व्यवस्थेत राष्ट्रीय पक्षापेक्षा प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व वाढत आहे. त्यामुळे राष्ट्रीय पक्षाला प्रादेशिक पक्षाच्या साहाय्याने सरकार स्थापन करणे भाग पडले आहे. यासाठी राष्ट्रीय पक्षाने समाजाभिमुख कार्य केले तर प्रादेशिक पक्ष आपोआप लोप पावतील.

१२) महाराष्ट्र हा ऐतिहासिकदृष्ट्या देशाच्या किंवा जगाच्या पाठीवर प्रसिद्ध आहे. येथील पर्यटन स्थळे जगामध्ये प्रसिद्ध आहेत. त्यासाठी या पर्यटन स्थळांचे जतन व त्यांचा विकास करणे गरजेचे आहे.

१३) महाराष्ट्रातील नैसर्गिक संपत्तीचा होणारा ऱ्हास टाळण्यासाठी वनसंरक्षक अधिनियम अधिक कडक करण्याची गरज आहे.

१४) महाराष्ट्रातील रोजगारांचा प्रश्न फार महत्त्वाचा असून सामाजिक विकासाच्या दृष्टिकोनातून जास्तीत जास्त बेरोजगार लोकांना रोजगार देण्यासाठी नियोजन करणे आवश्यक आहे.

१५) महाराष्ट्रातील समाजसुधारकांनी शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात दिलेल्या योगदानाची दखल घेऊन त्यांच्या कार्याचा धडा शैक्षणिक क्षेत्राच्या माध्यमातून नवयुवकांना देण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

१६) महाराष्ट्र औद्योगिकदृष्ट्या प्रगत राष्ट्र असले तरी शेतकरी व लघु उद्योगांना व त्यांच्या मालाला योग्य भाव देणे गरजेचे आहे.

१७) महाराष्ट्रातील प्रादेशिक पक्षांनी महाराष्ट्राच्या राजकारणात महत्त्वाचे स्थान निर्माण केले आहे. परंतु सामाजिक, आर्थिक धोरणाची रूपरेषा निर्माण केल्यास अस्तित्व आणखी वाढू शकते.

१८) महाराष्ट्रातील पक्षीय राजकारण हे जास्त करून जातीय आधारावर निर्माण झाले आहे. त्यामुळे पक्षीय राजकारणावर परिणाम होऊन याचा प्रभाव मतदान प्रणालीवर होत आहे.

१९) महाराष्ट्रातील शिवसेना-भाजप हे प्रभावी विरोधी पक्ष म्हणून महाराष्ट्राच्या राजकारणात ओळखला जातात. या पक्षांनी धार्मिक मुद्यांचे राजकारण जर सोडले तर सामाजिक समानतेच्या तत्वावर ते सत्तेमध्ये सहभागी होऊ शकतात.

२०) कोणत्याही सत्ताधारी पक्षाने आपल्या पक्षातील पारदर्शक नेतृत्वाला सत्तेमध्ये सहभागी करून घेण्याची गरज आहे. कारण की, स्वार्थी नेतृत्वामुळे भ्रष्टाचार, गुन्हेगारीकरण यासारख्या घटना होऊन पक्ष बदनाम होण्याची शक्यता असते.

२१) महाराष्ट्राच्या राजकारणात भारतीय रिपब्लिकन पक्ष हा दलित मतपेढी म्हणून प्रसिद्ध आहे. परंतु हा पक्ष विघटित असून प्रत्येक गटाचा फायदा कोणता पक्ष घेत आहे. म्हणून पक्षाला मजबूत बनायचे असेल तर रिपब्लिकन पक्षांनी एकत्र येणे गरजेचे आहे.

२२) महाराष्ट्राच्या राजकारणात अलिकडीलच स्थापन झालेला महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाने आक्रमकतेचे राजकारण स्वीकारले आहे. यामुळे या पक्षाचे भविष्य धोक्यात येण्याची शक्यता दिसून येत आहे. त्यासाठी आक्रमक राजकारणाला तिलांजली देणे आवश्यक आहे.

२३) महाराष्ट्रातील राजकारणात घराणेशहीचे प्राबल्य वाढल्यामुळे सामान्य राजकीय नेत्यांना व कार्यकर्त्यांना पक्षात योग्य न्याय मिळत नसल्याचे दिसते. यामुळे घराणेशाहीचा मार्ग पक्ष पद्धतीमध्ये धोक्याचा आहे.

२४) महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची वाटचाल मराठी अस्मिता जपणारी वाटचाल असली तरी त्यांनी सर्वधर्मीय ध्येय-धोरण ठरवले तर हा पक्ष भविष्यात पुढे जाऊ शकतो.

२५) महाराष्ट्र देशात औद्योगिक क्षेत्रात आघाडीवर असला तरी महाराष्ट्रातील सत्ताधारी राजकीय पक्षाने परकीय गुंतवणुकीच्या मर्यादा स्पष्ट कराव्या व स्थानिक उद्योगधंद्यांच्या विकासावर भर देणे आवश्यक असल्याचे दिसते.

२६) महाराष्ट्रातील राजकारणातील भारतीय जनता पक्ष हा प्रबळ पक्ष म्हणून ओळखला जातो पण या पक्षाने हिंदुत्ववादी विचारसरणीला लगाम देऊन सर्वधर्मीय विकासाचा उद्देश ठेवला तर भविष्यात हा पक्ष केंद्रीय व राज्य पातळीवर महत्त्वाची भूमिका पार पाडून सत्ताधारी पक्ष होऊ शकतो.

२७) महाराष्ट्राच्या राजकीय प्रक्रियेत येणाऱ्या पक्षांनी समाजाभिमुख व धर्मनिरपेक्ष विकासाचे धोरण स्वीकारून कार्य केल्यास महाराष्ट्रातील पक्षीय धोरण हे उच्च प्रतीचे राजकारण म्हणून ओळखले जाऊ शकते.

२८) महाराष्ट्रातील राजकीय विश्वात शरद पवार हे मोठे व्यक्तिमत्व म्हणून ओळखले जाते. त्यांच्या कार्याचे अनुसरण इतर पक्षीय नेत्यांनी करावे जेणेकरून पक्षीय विकास साधला जाऊ शकतो व आदर्श राजकारणास करण्यावर भर दिला जाण्याची शक्यता दिसून येते.

२९) राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष हा राष्ट्रीय पक्ष म्हणून ओळखला जातो. यामध्ये शरद पवार यांचा मोलाचा वाटा आहे. पण राष्ट्रीय पातळीवर या पक्षाचा म्हणावा तितका विकास झाल्याचे दिसून येत नाही. त्यासाठी या पक्षाने आपले संघटन इतर राज्यांत वाढविणे गरजेचे आहे.

३०) महाराष्ट्राच्या राजकारणात शेतकरी-कामगार पक्ष, मार्क्सवादी पक्ष, समाजवादी पक्ष, बहुजन समाज पक्ष यांचे अस्तित्व कमी झाले आहे. याचे महत्त्वाचे कारण कमजोर संघटन हे होय. यासाठी या पक्षाने आपले संघटन महाराष्ट्रात मजबूत करणे गरजेचे आहे.

३१) महाराष्ट्राच्या राजकारणात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने महत्त्वाचे कार्य केले आहे. परंतु अधिक पक्षीय विकास करून एकपक्षीय सत्ता स्थापनेच्या उद्देशाने कार्य करणे गरजेचे आहे.